# कार्यशाळेत स्वयंसेवकांनी सायबर गुन्ह्यांची दिली माहिती




कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेतील क्विक हिल सायबर वॉरियर क्लब व क्विक हिल फाउंडेशनतर्फे सायबर जागरूकता दिनानिमित्त 'सायबर सुरक्षा' या विषयावर ७ रोजी कार्यशाळा झाली. यात ॲड. श्रद्धा काबरा, ॲड. गायत्री विसपुते, ॲड. भक्ती उपासनी, प्रशाळेचे संचालक प्रा. सतीश कोल्हे यांनी मार्गदर्शन केले. प्रश्नमंजुषाही घेण्यात आली. कार्यशाळेत ७०० विद्यार्थी सहभागी झाले होते. सायबर स्वयंसेवकांनी सायबर गुन्हे कसे घडतात याची माहिती दिली. प्रा. राजू आमले, प्रा.अजय सुरवाडे उपस्थित होते.